# <u>रे.मु.नं.१४७४/२०१२ मधील नि.६ खालील आदेश</u>

१. वादीने सदरचा अर्ज मे.तालुका निरीक्षक भूमि अभिलेख, माळशिरस यांची कोर्ट कमिशनर म्हणून नेमणूक होणेसाठी दिला आहे.

२. वादीचे अर्जातील मजकूर थोडक्यात खालीलप्रमाणे आहे:—

वादीने सदरचा दावा प्रतिवादीविरूध्द सरकारी मोजणी होउन हददीखुणा कायम करणेसाठी व निरंतरचे मनाईसाठी केला आहे. दावा कलम १अ ते १ड हया मिळकती वादीचे मालकी हक्काने कब्जे वहिवाटीस आहेत. वादींनी सदर दावा मिळकती या खरेदी घेतलेल्या आहेत. तसेच यातील वादी नं. ३ चे दावा कलम १ अ गट नं. <u>३१९/३</u> च्या पूर्व बाजूस लगत यातील प्रतिवादी नं. १ यांची गट नं. ३१६ ही जमीन आहे व दक्षिण बाजूस गट नं. <u>३१९/२</u> व पश्चिम बाजूस गट नं. <u>३१९/७</u> या प्रतिवादी नं. २ च्या मिळकती आहेत. तसेच यातील वादी नं. १ व २ यांची जमीन गट नं. ३१९/४/ब च्या पूर्व बाजूस यातील प्रतिवादी नं. ३ ची गट नं. <u>३१९/४अ</u> ही मिळकत आहे व पश्चिम बाजूस यातील प्रतिवादी नं. २ यांची जमीन गट नं. <u>३१९/७</u> ही आहे. तसेच यातील वादी नं. १ व २ यांची जमीन गट नं. ३१९/५/ब च्या पश्चिम बाजूस यांतील प्रतिवादी नं. २ ची गट नं. <u>३१९/७</u> ही जमीन आहे. तसेच यातील वादी नं. ४ ची जमीन गट नं. <u>३१९/६</u> च्या पूर्व बाजूस यातील प्रतिवादी नं. ५ चा गट नं. ३१८ आहे व पश्चिम बाजूस प्रतिवादी नं. ४ ची जमीन गट नं. <u>३१९/८</u> ही जमीन आहे.

३. वादींच्या जमीनी हया प्रतिवादी नं. १ ते ५ यांचे मध्यभागी आहेत. त्यामुळे यातील प्रतिवादी हे गेल्या दोन वर्षापासून वादी यांचे जमीनीचा बांध हळूहळू पोखरून वादीचे जमीनीत अतिक्रमण करू लागले आहेत. त्यामुळे यातील वादीस आपल्या जमीनीच्या हददीखुणा कायम करून घेणे आवश्यक वाटू लागले आहे. तरी यातील वादीने प्रतिवादींना आपण सरकारी मोजणी करून आपापल्या हददीखुणा निश्चित करून घेउ असे म्हंटले असता प्रतिवादींनी त्यास स्पष्टपणे नकार दिला व आमच्या जमिनीची मोजणी करायची नाही व हददीखुण ही कायम करायच्या नाहीत अशी उर्मट भाषा केली. तसेच प्रतिवादी हे

मोजणीही मागवत नाहीत व मोजणीसाठी संमती ही देत नाहीत. म्हणून वादीस सदर दावा मिळकतीची सरकारी मोजणी स्वतंत्ररित्या मागविता आली नाही व हददीखुणा कायम करता आल्या नाहीत. म्हणून वादीस दाव्यात वर्णन केलेल्या मिळकतीची सरकारी मोजणी करून हददीखुणा कायम होउन मिळणेसाठी व निरंतरचे ताकीदीसाठी सदरचा दावा मे. कोर्टात दाखल करणे भाग पडले आहे. तरी मौजे पळसमंडळ येथील जमीनी गट नंबर ३१९/३, ३१९/४/ब, ३१९/५/ब व ३१९/६ ची सरकारी मोजणी होवून त्यांच्या हददीखुणा कायम हावून मिळाव्यात. तसेच सदरची मोजणी व हददीखुणा कयम होवून मिळणेसाठी मे. उप अधिक्षक भूमि अभिलेख, माळशिरस यांची कोर्ट कमिशनर म्हणून नेमणूक करणेत यावी. अशी वादीने विनंती केकली आहे.

४. वादीने सदर दावा मिळकतीची सरकारी मोजणी होउन हददीखुणा कायम होवून मिळणेसाठी दाखल केला आहे. वादीचे म्हणणेनुसार प्रतिवादींच्या मिळकती दावा मिळकतीला लागून आहेत, आणि प्रतिवादी हे वादींचे दावा जमीनींचे बांध हाळूहाळू पोखरून वादींचे जमीनीत अतिक्रमण करीत आहेत. सदर दाव्याचे कामी प्रतिवादी नं. १ व ५ यांना दाव्याचे समन्स मिळूनही ते हजर न झालेने त्यांचेविरूध्द दावा एकतर्फा चालविण्याचा आदेश पारित करण्यात आला आहे. तसेच प्रतिवादी नं. २ ते ४ यांनी दाव्याचे कामी हजर होवूनही मुदतीमध्ये कैफीयत न दिल्याने त्यांचेविरूध्द दावा विना कैफीयत चालविण्याचा आदेश पारित करणेत आला आहे. दाव्याचे अभिलेखावरून असे दिसून येते की, दिनांक ८.४. २०१३ रोजी प्रतिवादी नं. २, ३, ४ तर्फे दावा बोर्डावर घेवून दाव्यास कैफीयत व मोजणी अर्ज म्हणणे देण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे. मात्र दावा विना कैफीयत चालविण्याचा झालेला आदेश रदद करून मागणीसाठी त्यासोबत अर्ज देण्यात आलेला नाही. त्यामुळे त्यांची कैफीयत दाखल करून घेणेत आलेली नाही. त्यामुळे वादीच्या मोजणी अर्जास अदयापपावेतो कोणताही खुलासा रेकॉर्डवर आलेला नाही. वादीने कथन केल्याप्रमाणे प्रतिवादी हे दावा मिळकतीमध्ये अतिक्रमण करीत आहेत. त्यामुळे वादी व प्रतिवादीमधील वाद हा हददीचा वाद आहे. त्यामुळे अशा परिस्थितीत वादीने विनंती केल्याप्रमाणे त्यांच्या दावा मिळकतींची मा.उपअधिक्षक, भूमि अभिलेख, माळशिरस यांचेमार्फत मोजणी करणे न्यायोचित ठरेल. वादी प्रतिवादीमधील वादाचे कायमस्वरूपी निराकरण होणेसाठी सदर अर्ज

मंजूर होणे आवश्यक ठरेल. सबब वादीचा अर्ज मंजूर होणेस पात्र आहे असे मी धरतो व पुढीलप्रमाणे आदेश पारित करतो.

## **आ दे श**

१. वादीचा अर्ज मंजूर करणेत येत आहे.

२. मे.उपअधिक्षक, भूमि अभिलेख, माळशिरस यांची कोर्ट कमिशनर म्हणून नेमणूक करणेत येत आहे. कोर्ट कमिशनर यांनी दावा मिळकत मौजे पळसमंडळ ता.माळशिरस येथील गट नं.३१९/३, ३१९/४/ब, ३१९/५/ब व ३१९/६ ची मोजणी करून हददीखुणा दाखवाव्यात. तसेच त्यामध्ये दावा कलम १अ ते १ड मध्ये प्रतिवादींनी अतिक्रमण केले आहे का नाही हे दर्शवावे व मोजणीचा अहवाल न्यायालयात सादर करावा.

३. वादी यांनी मोजणीची फी मे. उपअधिक्षक, भूमि अभिलेख, माळशिरस यांचे कार्यालयात जमा करावी.

दिनांक: २६.८.२०१३.

(वै.वि.पाटील)
२ रे सह दिवाणी न्यायाधिश क.स्त
माळशिरस